मे 2016 | ₹ 40 | पृष्ठ संख्या 40 | पुणे, वर्ष 6 | अंक 05

आर्थिक साक्षरता +
पारदर्शकता =
स्वाभिमानी भारत

# अर्थपूर्ण

## अर्थपूर्ण जीवने

आर्थिक समतेचे बाबासाहेबांचे स्वप्न 'अर्थक्रांती' पूर्ण करेल : अण्णा हजारे

शाश्वत जीवनशैलीची हाक

रघुराम राजन यांच्या विधानांचा अर्थ

# 'पनामा पेपर्स' हा तर आजच्या जगाचा आरसा!



संपादक
यमाजी मालकर

सहसंपादक
सम्राट शिरवळकर

व्यवस्थापक
अशोक तुळपुळे

संपर्क : editor.arthapurna@gmail.com, 9860580147

'अर्थपूर्ण' पब्लिकेशन्स प्रा. लि.
11, 'हर्षदा', रामबाग कॉलनी,
पौड रोड, पुणे 411038
**फोन :** 020-25430540,
www.arthapurna.org

# अर्थपूर्ण

मे 2016

वर्ष सहावे
अंक पाचवा

**डिझाईन**
ऑफबीट कॉन्सेप्टस्, पुणे.
9881098010

**व्यवस्थापन साहाय्य**
महेंद्र बनसोडे

**वार्षिक वर्गणी व टपालासंबंधी**
व्यवहारासाठी संपर्क
020-25430540
9921926538
arthapurna.monthly@gmail.com

**जाहिरात संपर्क**
राजन मिडिया स्टेशन
9922920765
अर्चना जोशी
9552591874

'अर्थपूर्ण'मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या साहित्य आणि विचारांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

'अर्थपूर्ण' हे मासिक मालक, अर्थपूर्ण पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्याकरिता मुद्रक व प्रकाशक यमाजी मालकर यांनी विक्रम प्रिंटर्स प्रा. लि. 31, 34 पर्वती इंडस्ट्रीयल इस्टेट, पुणे-सातारा रस्ता, पुणे ९ येथे छापून ए-702, साम्राज्य, शिवतीर्थनगर, पौड रस्ता, पुणे 411038 (सुतारदरा बसथांब्याजवळ) येथे प्रसिद्ध केले.
संपादक : यमाजी मालकर

# अनुक्रमणिका

06 'पनामा पेपर्स' हा तर आजच्या जगाचा आरसा!... यमाजी मालकर

08 अर्थभान

18 रिझर्व बँकेत हे काय चालले आहे?... विजय गोखले

20 आर्थिक समतेचे बाबासाहेबांचे स्वप्न
'अर्थक्रांती' पूर्ण करेल....अण्णा हजारे

22 बादशहा अकबर, बिरबल आणि वांगे... प्रसाद भागवत

24 गुंतवणूक कालावधी किती असावा?.... प्रशांत बने

26 UPI हे NPCI चे उत्कृष्ट पाऊल,
पण बँकिंग व RBI ची साथ गरजेची.... विभव केळकर

29 काळ्या पैशावर हवा कायमस्वरूपी उपाय.... अनिल बोकिल

30 'अर्थक्रांती' संबंधित निवडक चर्चा

32 दरिया दिल दुकान

34 शाश्वत जीवनशैलीची हाक.... भारतीय

## भूमिका



**यमाजी मालकर**
ymalkar@gmail.com

# ‘पनामा पेपर्स’ हा तर आजच्या जगाचा आरसा!

**जगात भांडवलाची लुटमार सुरू असून त्यासाठीची ओढाताण हे सारे जग आज अनुभवते आहे. हा ताण इतका आहे की तो आता आपल्या देशात, राज्यात, कंपनीत, कार्यालयात, शहरात, सर्व समाजात आणि कुटुंबातही जाणवू लागला आहे. त्या ताणाचे मूळ माणसाच्या वृत्तीत शोधण्याचे थांबवून पैशांच्या माध्यमातून जी लूट चालली आहे, ती समजून घेतली पाहिजे आणि तिला त्याच भाषेत उत्तर देण्यासाठी आर्थिक व्यवहारांवर फी लावण्याचा मार्ग सांगणाऱ्या ‘अर्थक्रांती’वर आधारित बदलाला बळ दिले पाहिजे.**

आपल्या देशात न्याय्य आणि सुलभ करपद्धती अंमलात आणली नाही आणि पैसे गुंतविण्याचे चांगले मार्ग निर्माण केले गेले नाहीत तर जगात सर्वत्र संपत्ती लपविण्याचा जीवघेणाखेळ कसा खेळला जातो, हे पनामा पेपर्सने पुन्हा एकदा जगासमोर आणले आहे. जगातील राष्ट्रप्रमुख,
सिने अभिनेते, खेळाडू आणि इतर गर्भश्रीमंत आपल्या भविष्याविषयी किती असुरक्षित आहेत, याचे एक विदारक, केविलवाणे चित्रही यातून दिसते. सर्वांत महत्वाचे म्हणजे जगात किती प्रचंड संपत्ती निर्माण होते आहे पण ती प्रवाही ठेवून गरजूंपर्यंत पोचविण्याऐवजी कशी सडवत ठेवली जाते, हे ही कटू सत्य आज सहन करण्याची वेळ आली आहे. जगात आणि आपल्या देशात अलीकडे दररोज घडणाऱ्या अशा अनेक घटना आपल्याला ‘अर्थक्रांती’च्या पाच प्रस्तावांची आठवण करून देऊ लागल्या आहेत. ‘पनामा पेपर्स’ आणि आपल्या देशात व्यवहारात पुन्हा वाढत असलेली रोख रक्कम ही त्याची ठळक उदाहरणे आहेत.

‘इंटरनॅशनल कंझोर्टियम ऑफ इनव्हेस्टिगेटीव्ह जर्नालिस्ट्स (ICIJ)’ आणि ‘ऑर्गनाईज्ड क्राईम ॲण्ड करप्शन रिपोर्टिंग प्रोजेक्ट (OCCRP)’ या दोन संस्थांनी उघड केलेल्या ‘पनामा पेपर्स’नी आधुनिक जगातील अतिश्रीमंतांची पोलखोल केली आहे. पनामा देशातील कायदा क्षेत्रातील एक कंपनी ‘मोसेक फोंसेका’चे जवळपास एक कोटी 15 लाखांहून जास्त कागदपत्र लीक झाले असून त्यात 50 पेक्षाही अधिक देशांतील 140 राजकीय नेते आणि शेकडो उद्योजक, खेळाडू, चित्रपट अभिनेते यांनी केलेल्या आर्थिक बनवाबनवीचा पर्दाफाश करण्यात आला आहे. आधुनिक जगाने सर्व क्षेत्रात इतकी उत्तुंग झेप घेतली असताना त्याने ज्या पैशाला जन्म दिला, तोच पैसा कसा राक्षस झाला आहे, याची प्रचिती हे कागद देत आहेत. इतर सर्व करपद्धती कालबाह्य झाल्या असून पैशांच्या व्यवहाराची फी घेणे, हीच पैसा प्रवाही आणि शुद्ध ठेवण्याचा तसेच तो सर्वांना किफायतशीर दरांत उपलब्ध करून देण्याचा एक चांगला मार्ग ठरू शकतो, हे जगाला आता मान्य करावे लागणार आहे.

राजेशाहीतील मनमानी, अत्याचारी हुकुमशाही, समन्यायी व्यवस्था प्रस्थापित करण्याचा दावा करणारा साम्यवाद, स्वातंत्र्याची ग्वाही देणारी लोकशाही आणि प्रत्येकाला संधी देण्याचा दावा करणारी भांडवलशाहीतील लोकशाही, असा प्रवास जगाने केला आहे. अनेक देशांत राजसत्तेकडून प्रजेची सत्ता प्रस्थापित झाली खरी, पण सत्तेच्या नाड्या तोपर्यंत अर्थकारणाने आपल्या ताब्यात घेतल्या होत्या. त्यामुळेच आज राजकीय नेते देशांचे नेतृत्व करताना दिसत असले तरी ज्यांच्या हातात पैसा आहे, त्यांना दुखावण्याचे धाडस ते गमावून बसले आहेत, असे चित्र सर्वत्र दिसते आहे. याचा अर्थ पैशांची लूट, ‘शाही’ किंवा ‘वाद’ कोणताही असो, हे सर्व व्यवस्थांत केली जाते आहे, हे यामुळे पुन्हा जगासमोर आले, हे फार महत्वाचे आहे. अर्थात, गेली काही वर्षे सत्तेवर अंकुश ठेवण्याच्या सामुहिक शहाणपणाला जागरूकता आणि माहिती तंत्रज्ञानाची जी जोड मिळाली आहे, तिला तोड नाही. ‘विकीलीक्स’ने केलेला गौप्यस्फोट आणि ‘पनामा पेपर्स’ची पोलखोल ही त्याचीच प्रचिती आहे. पैशांच्या व्यवहारात जगाला पारदर्शी व्हावेच लागेल, या विचारला बळ

दिल्याशिवाय हे प्रश्न सुटणार नाहीत, असाही संदेश ही प्रकरणे देत आहेत.

भारतासारख्या देशात काळ्या पैशांचे प्रमाण किती आहे, हे आजही कोणी सांगू शकत नाही. सरकारने त्यासाठी नेमलेल्या समित्यांनी हात टेकले असले तरी जगात काळा पैसा नेमका कोठे आणि कसा जातो, याच्या चोरवाटा शोधण्याचा आणखी एक मार्ग या कागदांनी खुला केला आहे. 'मोसेक फोंसेका' ही कंपनी आपल्यावरील आरोप फेटाळत असली तरी काळ्या पैशाला लपण्यास जागा देणे, हेच या संस्थेचे काम राहिले आहे. रशियाचे अध्यक्ष ब्लादिमीर पुतिन, पाकिस्तानचे पंतप्रधान नवाज शरीफ, माजी पंतप्रधान बेनेझीर भुट्टो, आईसलंडचे पंतप्रधान, सौदी अरेबियाचे राजे आणि त्यांचे कुटुंबीय यांनी आपला काळा पैसा या कंपनीच्या मार्गाने लपविला, असे हे कागदपत्र सांगतात. परदेशात गोपनीयपणे कंपन्या स्थापन करून हा गोरखधंदा करण्यात आला आहे. भारतीय राजकीय नेत्याचे नाव अजूनतरी समोर आलेले नाही, पण या यादीत भारतातील जवळपास 500 कंपन्यांची नावे आहेत, अशी माहिती उघड झाली आहे. सरकारने हे प्रकरण गंभीरपणे घेऊन त्याचा छडा लावण्यासाठी एक चौकशी समितीही नेमली, हे चांगले झाले. अभिनेते अमिताभ बच्चन, ऐश्वर्या राय-बच्चन, गरवारे कुटुंबीय, शिशिर बाजोरिया, ओंकार कंवर अशा काही मोजक्या भारतीय धनाढ्यांची नावेही समोर आली आहेत. पण भारतातील 500 कंपन्या असा उद्योग करत असतील तर त्यांच्यावर ही वेळ का आली आणि त्यांचे व्यवहार तपासले तर त्याच्या परिणामांची काळजी भारताला करावी लागेल. ज्या देशांत गुंतवणुकीच्या चांगल्या संधी नाहीत आणि ज्या देशांतील करपद्धती जाचक आहे, अशा देशांतील श्रीमंत अशा मार्गाने जातात, हे स्पष्ट झाले आहे. ह्या सर्व क्लृप्त्या केल्या जातात, त्या मुळात कर चुकविण्यासाठी. याचा अर्थ त्यात अमुलाग्र बदल करण्याची वेळ आलेली आहे, असाही संदेश 'पनामा पेपर्स' देत आहेत. उद्योगधंद्यात पैसा गुंतविला तर त्याला उत्तम परतावा मिळतो, अशी खात्री असेल तर श्रीमंत मंडळी आपला पैसा त्यात गुंतवतील आणि त्यातून जगात भांडवल फिरत राहील तसेच रोजगार संधी वाढतील. त्यातून जग पुढे जात राहील. पण तो प्रवाह थांबला तर जगात संपत्ती कशी सडत पडते, हे पनामा पेपर्सने दाखवून दिले आहे. दुर्दैवाने एवढे सगळे होऊन करपद्धतीतील सकारात्मक बदलाविषयी देशातील अर्थतज्ज्ञ अजूनही मूग गिळून बसले आहेत.

'कर चुकविण्यासाठीचे स्वर्ग' असे ज्या देश आणि बेटांचे वर्णन केले जाते, तेथे जगातील लबाड अतिश्रीमंतांनी आपला चोरमार्गाने राखलेला पैसा ठेवला आहे, हे तर लपून राहिलेले नाही. तो पैसा त्या त्या देशांत कसा परत येईल, यासाठीचे प्रयत्न भारतासह जगात सध्या सुरू आहेत. भारतात तर हा मोठाच मुद्दा झाला आहे. कारण 126 कोटी भारतीयांत




जी प्रचंड आर्थिक विषमता माजली आहे, तिचे अतिशय घातक परिणाम सध्या भारत भोगतो आहे. कमीअधिक फरकाने साऱ्या विकसनशील आणि अविकसित जगात हीच स्थिती आहे. काम करण्याची, घाम गाळण्याची आणि नवनिर्मिती करण्याची या जगाची तयारी आहे. पण त्यासाठी जे भांडवल लागते, त्याची जगात लुटमार करण्यात आली असून त्यासाठीची ओढाताण हे सारे जग आज अनुभवते आहे. हा ताण इतका आहे की तो आता आपल्या देशात, राज्यात,कंपनीत, कार्यालयात, शहरात, सर्व समाजात आणि कुटुंबातही जाणवू लागला आहे. त्या ताणाचे मूळ माणसाच्या वृत्तीत शोधण्याचे थांबवून पैशांच्या माध्यमातून जी लूट चालली आहे, ती समजून घेतली पाहिजे आणि तिला त्याच भाषेत उत्तर देण्यासाठी आर्थिक व्यवहारांवर फी लावण्याचा मार्ग सांगणाऱ्या 'अर्थक्रांती'वर आधारित बदलाला बळ दिले पाहिजे. 'अर्थक्रांती'चे पाच प्रस्ताव हे काळा पैसा मूळातच तयार होणार नाही, याची काळजी घेतात. अनेक राजकीय, सामाजिक आणि आर्थिक प्रश्नांचे मूळ असलेला काळा पैसा तयारच झाला नाही तर आजच्या जगाचा चेहरा सुधारण्याची शक्यता आहे. जगाच्या भविष्याची चिंता करणाऱ्यांची संख्या वाढत चालली आहे, ही चांगली गोष्ट आहे पण ती चिंता वांझ ठरायची नसेल तर पैशांच्या राक्षसाला आधी वठणीवर आणावे लागेल.